Impact Factor
5.604
www.sjifactor.com

ISSN p-2454-7409
Vol. 5 Issue 1
Jan. 2020
Regular Issue

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष पाचवे अंक पहिला जानेवारी २०२०

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

**Peer Reviewed Annual National Indexed Research Journal in Marathi**

Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Scanned with OKEN Scanner

Impact Factor 5.604

p-ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 5 ISSUE 1 January 2020
वर्ष पाचवे, अंक पहिला, जानेवारी २०२०
URL
www.indiramahavidyalaya.com/IssuesFolder.php?q=MPSP%202020%20Vol.%205%20Issue%201

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President. Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ Editorial Board

डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे

1. **Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: 9422608715
2. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: 9422153353
3. **Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: 9765034097
4. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: 9923909296
5. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: 9420199479

Scanned with OKEN Scanner

## निमंत्रित संपादक मंडळ

विक्रम राजे, 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ. Berkshire. United Kingdom
डॉ. अनिता गुप्ते पाटील, Auckland, New Zealand
रणजीत राजे, 201/83 Whiteman Street, Southbank. Melbourn. VIC-3006. Australia
विशाल डहाळकर, 20747. N Margaret Ave. Prairie View. IL 60069 USA

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद कार्यकारिणीचे सर्व सदस्य

अध्यक्ष – डॉ. पवन मांडवकर
उपाध्यक्ष – डॉ. ममता इंगोले
कोषाध्यक्ष – डॉ. मंजू आंबे
सहसचिव – डॉ. चंदू पाखरे
सदस्य – प्रा. महेंद्र गिरी
सदस्य – डॉ. अनिल नाफुळकर
महिला प्रतिनिधी – डॉ. शोभा रोकडे, डॉ. सुलभा खर्चे
जिल्हा प्रतिनिधी – अमरावती – डॉ. भूमिका वानखडे, डॉ. पंकज वानखडे
अकोला – डॉ. मनोज फडणीस, डॉ. शिवाजी नागरे
बुलढाणा – डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. अनुराधा गुळे
यवतमाळ – डॉ. मीना अंदुरे (जुनघरे), डॉ. रूपेश कऱ्हाडे
वाशिम – डॉ. शरद उमाटे, डॉ. शरद बाभोळे

## सल्लागार मंडळ

सोनाली डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View. IL 60069 USA
डॉ. शशिकांत सावंत, विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन, मध्यप्रदेश
डॉ. अनिल गजभिये, माजी प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, सरदारपूर, जि. धार, मध्यप्रदेश
डॉ. धनाजी गुरव, प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जि. रायगड
डॉ. लीला मोरे, सेवानिवृत्त प्राध्यापक, शासकीय कला वाणिज्य महाविद्यालय, इंदौर, मध्यप्रदेश
डॉ. सिंधू मांडवकर, सेवानिवृत्त प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
डॉ. किसन पाटील, एम.जे. कॉलेज, जळगाव, खान्देश



**मुद्रक :** सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक :** डॉ. पवन मांडवकर



Communication
Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91 9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com



**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-** by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001



(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)




Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | 4 |
| 1 | सण उत्सवाच्या स्त्री लोकगीतांमधून उमटणारी देशीयता | डॉ. अतुल चौरे | 5-9 |
| 2 | मूर्तिपूजा राष्ट्रसंतांचा दृष्टिकोन | डॉ. प्रवीण कारंजकर | 10-12 |
| 3 | संत सावता माळी | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 13-16 |
| 4 | महादेवाच्या गाण्यातील सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक संदर्भ | डॉ. न.ह. खोडे | 17-21 |
| 5 | घर याचे हृदयी माझ्या : सामाजिक, सांस्कृतिक आशय सांगणारी कविता | प्रा. मिलिंद भिवाजी कांबळे | 22-24 |
| 6 | भारतीय भक्ती चळवळ आणि लोकभाषा यांचा अनुबंध | डॉ. उज्ज्वला वंजारी | 25-27 |
| 7 | संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील प्रारब्धवाद | डॉ. रेखा वडिखाये | 28-31 |
| 8 | स्वाती चांदोरकरांच्या कथेतील नियती शरण नायिकांचे चित्रण | प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | 32-34 |
| 9 | मराठी भाषेवरील फार्सी भाषेचा प्रभाव : एक अनुबंध | प्रा.डॉ. लिंगायत विशाल प्रकाश | 35-38 |
| 10 | मराठी साहित्यात प्रतिबिंबित 'मानवतावाद' | प्रा.डॉ. विजय रूपराव राऊत | 39-43 |
| 11 | समन्वयकार संत नामदेव महाराज | डॉ. अशोक भक्ते | 44-48 |
| 12 | आदिवासी साहित्य आणि श्रमसंस्कृती | प्रा.डॉ. कृष्णा महादू भवारी | 49-52 |
| 13 | वेदनेतून निर्माण होऊन विद्रोहांकडे जाताना स्वत:चे अस्तित्व निर्माण करणारा प्रतिभेचा प्रवाह म्हणजे दलित साहित्य | डॉ. रमाकांत विठ्ठल ईटेवाड | 53-57 |
| 14 | वैदर्भीय संतांचे पसायदान आणि त्यांचे युगभान | डॉ. संजय नी. पाटील | 58-62 |
| 15 | शंकर पाटील यांचा 'गारवेल' कथासंग्रह एक आकलन | प्रियंका आकाश राऊत | 63-66 |
| 16 | विलास अंभोरे यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रा. तुकाराम कांबळे | 67-69 |
| 17 | नव्वदोत्तरी कादंबरीतील वास्तव स्त्रीजीवन (सदानंद देशमुख यांच्या 'तहान' व 'बारोमास' संदर्भात ) | डॉ. वर्षा गणगणे | 70-73 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा आढावा | प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार | 74-79 |
| 19 | ग्रामीण कवितेतील जागतिकीकरण | डॉ. अशोक रा. इंगळे | 80-84 |
| 20 | अविनाशी फुले | शिवाजी रघुनाथ मोतीबोणे | 85-90 |
| 21 | 'महात्मा' सर्जनशील लेखकाची संधोधनात्मक कादंबरी | प्रा. डॉ. विनोद राठोड | 91-94 |
| 22 | स्त्री- प्रतिमा आणि प्राचीन मराठी साहित्य | प्रा. कविता राजाभोज | 95-98 |




Scanned with OKEN Scanner

# संत सावता माळी

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर – ४४१ १०४ महाराष्ट्र (India)
Email- vyankateshpotfode28@gmail.com Mob.: 9422816697
Resi.: 'Progressive Heritagh', Flat No.201, Plot No.46, A/ Ramana Maroti Nagar, Nagpur 440024

## प्रस्तावना

संत सावता यांचा जन्म सोलापूर जिल्हयातील आरण भेंडी, ता. माढा, या गावी इ. स. १२५० मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव परसोबा व आईचे नागीताबाई होते. हे विठ्ठलभक्त दांपत्य माळी समाजाचे होते. सावता याला बालपणापासूनच भजनाचा नाद होता. तो दगडांचे टाळ करून वाजवी. सवंगडी त्याला 'साधू' म्हणत. सावता पांडुरंगाचा भक्त बनला. पुढे तो लग्नाचा झाला. आईवडिलांनी शेजारच्याच भेंडी नावाच्या गावातील रूपगुणसंपन्न मुलगी जनाबाई हिच्याशी त्याचा विवाह करून दिला. त्यांचा प्रपंच सुरू झाला. त्यांना नागाताई व विठ्ठल अशी दोन अपत्ये झाली. कुटुंब आपल्या शेतामध्ये अतिशय श्रम करीत असे. त्यांच्या शेतात पाणी कधी न आटणारी विहीर होती. त्यामुळे त्यांचा मळा फळाफुलांनी समृध्द असायचा. सावता पहाटेपासून सायंकाळपर्यंत मळयात श्रम करायचा. घरी आल्यावर विठ्ठलाचे भजन करायचा. सावता माळ्यचे अभंग काशीबा गुरव लिहून ठेवत होते. जेवण झाल्यावरही विठ्ठलाचे नामस्मरण करीतच तो झोपायचा. जनाबाई आल्यागेल्याचे उत्तम आदरतिथ्य करीत असे. जनाबाई सावत्यांच्या संसाराची शोभा होती. सावतोबाचा मळा वर्षभर कोणती ना कोणती फळझाडे, पालेभाज्या, फुलझाडांनी बहरलेला असे. तो मळा पाहता असताना सावतोबाला पानाफुलात, फळाफळात , झाडावेलीत सर्वत्र देव दिसायचा. तो मळा विठ्ठलभक्तीचा मळा झाला होता.

आमुची माळियाची जात । शेत लावू बागाईत।।
आम्हा हातीं मोट – नाडा । पाणी जातें फुलझाडा।।
शांती – शेवंती फुलली । प्रेम – जाई जुई व्याली।।
सावतानें केला मळा । विठ्ठल देखियला डोळा।।

## जीवन

आरणभेंडीला महादेवशास्त्री राहत असत. ते कीर्तन करायचे, प्रवचन द्यायचे, भागवताचे सप्ताह करायचे. त्यांचा गजानन नावाचा मुलगा एकदा आजारी पडला. वैद्यराजाने औषधी दिली, इतरही उपाय केले पण त्याच्या प्रकृतीत उतार पडेना. शेजारच्या रमाबाई त्याला बघायला आल्यां आणि त्यांनी सांगितलं कीं त्यांच्याही मुलगा असाच आजारी पडला होता. सावतोबानं औषध दिल्याने तो बरा झाला. शास्त्रीबुवा सावतोबांना अगदी तुच्छ लेखत होते. पण बायकोच्या आग्रहामुळे ते सावतोबाकडे गेले. सावतोबाने वाहत्या पाटातील माती, एक रोपटे व आल्याचा ओला तुकडा यांचा रबडीलेप तयार केला. एका वनस्पतीच्या रस काढला. आणि हे औषध त्यांना दिले. त्या औषधाने मुलाचा आजार बरा झाला. याच पध्दतीने सावतोबांनी अनेकांना आजारमुक्त केले. याचा अर्थ त्यांना वनस्पतीच्या औषधासंबंधीची माहिती होती.

विठ्ठलनामाचा गजर करत आषाढी वारीसाठी वारक–यांची एक दिंडी पंढरपूरला निघाली होती. त्यांचा रस्ता मळयापासून जात होता. सावतोबाने सर्व वारक–यांना आत बोलावले. त्यांचा आदर सत्कार केला. जनाबाईने त्यांना रानमेव्यांचा पाहुणचार दिला. वारक–यांचा थकवा गेला मग वारक–यांनी सावतोबाला आपल्या सोबत पंढरीला येण्याचा आग्रह केला पण त्यांनी नम्रपणे नकार दिला. सौ. मंदा हिवसे लिहीतात, ''देवाने मला जे काम दिले त्यात हयगय झाल्यास मी अपराधी ठरेल. मळयाच्या कामातच मला विठ्ठल सेवेचा आनंद मिळतो. हीच माझी पंढरी. आता हे पीक वाढीला लागले. लहान बाळाची काळजी घ्यावी तशी या मळयातील रोपटयांची काळजी घ्यायला हवी. नाहीतर ती कोमेजतील. मळयातील ही रोपं म्हणजे विठ्ठलनामाचा जप सुरू होता, त्यातून मला विठ्ठल नामाचा नाद ऐकू येतो. तो ऐकला की माझे हात दुप्पट काम करतात. याप्रमाणे त्यांनी भक्तिमार्गात कर्मयागाला प्रथम स्थान दिले.'' आणि सावता गाऊ लागले –



Scanned with OKEN Scanner

कांदा, मुळा, भाजी । अवघी विठाबाई माझी।।
लसून मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी।।
ऊस गाजर रताळू । अवघा झालासे गोपाळू।।
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी।।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठलपायी गोविला गळा।। ५ ।।

एकदा नागूने सावतोबाला विचारले, "बाबा, शिवाबरोबर मीही जाऊ का विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपूरला?" सावतोबा म्हणाले, "कशाला? देव इकडे, तिकडे, सर्वत्रच आहे." त्यावर ती म्हणाली, " मग तो दिसत कसा नाही?" सावतोबाने तिला फूल हुंगायला दिले. सावतोबा म्हणाले, "सुगंध आला ना? पण तो दिसत नाही."

सावतोबाच्या शेतात मध्यभागी म्हसोबा होता. तो शेतकामात अडथळा नको म्हणून सावतोबा, जनाई व नागू या तिघांनी मिळून हटवला, यानंतर आठ दिवसांनी पंढरीला गेलेली दिंडी अरणगावाला परतली. दिंडीतील काही लोकांना तिकडेच बोंब ठोकली, 'म्हसोबाला हलवलं म्हणून पटकी आली. सावतोबावर जळफळणाऱ्या लोकांना ही संधीच मिळाली. पाटीलही त्यातलाच: त्यानं रात्री मरीआईचा दरबार भरवला. एक भक्तीण घुमू लागली. तिनं सांगितले की सावत्याने म्हसोबाचा अपमान केला म्हणून मी कोपले.' सर्वांनी तिला माफी मागितली. तुला चार पायाच्या नैवेद्य देऊ म्हणून कबूल केलं. त्यासाठी सावत्याचे बकरे बळी देण्याचा विचार केला. इकडे सावता मात्र पटकीच्या रूग्णांची सेवा करायला रात्रंदिवस घरोघरी जात, आजा–याला दवापाणी देत, त्यांच्या घरच्यांना धीर देत, ते ब्राम्हणांकडे ही जात, महार – मांगांकडे ही जात. त्यांची जनसेवा अखंड चालू होती.

## क्रांतिदर्शी व्यक्तिमत्त्व

सावतोबांचे व्यक्तिमत्वच क्रांतिदर्शी होते. "कोणतेही व्यक्तिमत्व सहजासहजी निर्माण होत नाही. त्याच्या मागे काहीतरी ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. जीवन जगत असताना एखाद्या घटनेचा वैचारीक आघात त्यांच्यावर झालेला असतो. त्यातून त्यांचे चिंतन सुरू होते व त्यातूनच त्यांचे व्यक्तीमत्व घडत जाते. त्यांच्या या चिंतनाला तत्कालीन, सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, वैचारिक स्थिती सहाय्यभूत ठरते. यातूनच त्यांचे तत्वज्ञान निर्माण होते. त्याचे तत्वज्ञान समाजाकडून स्वीकारले जाते. "म्हणूनच गावातील काही समंजस लोकांनी पाटलांना सांगितले की मुळात ही पटकी दिंडीबरोबर आली. तो तर बिचारा रूग्णांसाठी जिवापलीकडे कष्ट घेतो, उपचार करतो. पण त्या सज्जनांचा आवाज निगरगट्ट दुर्जनांपुढे दबून गेला. त्यांनी गुडांना हाताशी धरले: गुंड सावतोबांच्या मळयात गेले. म्हणाले, "म्हसोबा जिथं होता तिथं ठेव आणि प्रायाश्चित घे. नाहीतर गाव तुला वाळीत टाकील." सावतोबा म्हणाले, "देव ठेवील तसे राहू. "पटकीची साथ गेली. गाव शांत झालं. पण कारस्थानी लोकांच्या मनात मात्र खदखदतच होतं. कारण सावतोबांचा मळा अतिशय वैभवशाली होता आणि संसारही अतिशय सुखी होता, त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांची कीर्ती दिगंत पसरू लागली होती व या कारस्थानी माणसांना गावचे लोक विचारी नासे झाले होते. त्यांनी मरीआईची मिरवणूक काढली. तिच्यापुढे द्यायला म्हणून सावतोबांच्या मळयात शिरून त्यांचे बकरे ओढून नेले. त्यांना विराध केला म्हणून सावतोबांना जबरदस्त मारहाण केली. सावतोबा बेशुध्द पडले. काही भली माणसे धावून आली. त्यांनी सावतोबांना घरी नेले. "सावतोबांनी हा दु:ख निमुटपणे सहन केले, दुष्टांबद्दल असूया, तिरस्कार न दाखवता उदार मनाने त्यांना क्षमा करून आलेल्या सज्जनाना म्हणाले – गडे हो! झाल्या घटनेबद्दल कोणलाही दोष देण्याचे कारण नाही."[३]

सावतोबांच्या या शांत व क्षमाशील प्रवृतीमुळे विरोधक आणखीच खवळले. एका अंधाऱ्या रात्री हातात जळते पलिते घेऊन ते सावतोबाच्या मळयात घुसले आणि उसाचा मळा पेटवला, केळाची बाग झोडपली. पिकात गुरे घातली, फुलझाडांचा चुराडा केला, फळझाडं तोडली, विहीर पार बुजवून टाकली, खळयाला आग लावली, गोठा पेटवला. आतली गुरं – वासरं भाजून मेली. फक्त ढवळया–पवळयाची जोडी पळून जाण्यात यशस्वी झाली. ज्यांनी ही आग लावली तेच लोक गावात येऊन ऊर बडवून सांगू लागले, "सावत्याच्या मळयात दरवडा पडला. आजारपणामुळे घरी झोपलेले मळयाकडे धावले. दु:खी मनाने मळयात हिंडले आणि मुर्च्छित होऊन खाली कोसळले. त्यांची पत्नी, नागू व गावातील काही माणसंही मळयात येऊन पोहचली. सावतोबा फक्त नामस्मरण करीत होते. गावातून त्यांच्याकरीता गावातून जेवण आले व त्यांनी ते स्वीकारले नाही. कारण स्वत: कमावलेलं खाणे हा त्यांचा बाणा होता. म्हणून नागूने धु–यावरची रताळी, शेंग, गाजरं आणली. सावतोबांनी ती खाल्यावर



Scanned with OKEN Scanner

त्यांना जरा हुशारी आली. मग रात्री हे तिघेही उजाड शेतात उघड्यावरचं झोपले. सावतोबांनी मनात जिद्द धरली.

## व्यवसायनिष्ठा

त्यांच्या मते शेतकरी नि तपस्वी सारखेच. शेतकऱ्यांचे कष्ट म्हणजे तपच होय. तो मातीतून मोत्यांच्या राशी निर्माण करतो, जगाला पोसतो. विश्वाचं वैभव निर्माण करतो. तो आणि त्यांचे कुटुंब यांनी प्रथम विहीर खणायला सुरवात केली. दिवसभर काम आणि नव्यानं बांधलेल्या खोपट्यापाशी रात्री भजन करीत होते. भजन ऐकायला लोक येऊ लागले. त्यांनी सावतोबांना मदत करायचा चंग बांधला. सावतोबांच्या पाठीशी जनता जनार्दनाची शक्ती उभी राहिली. विहीरीसाठी जमीन खोदली तोच सात आठ फूटावर पाण्याची कारंजी उसळली. शेत पूर्वीपेक्षा ही अधिक समृध्द झाले.

नामाचिया बळे न भीऊ सर्वथा । कळिकाळाच्या माथा सोटे मारूं।।
वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी । विठ्ठल माऊली नाचो रंगी।।
सुखाचा सोहळा करूनी दिवाळी । प्रेमे वनमाळी चित्ती धरू।।
सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणे मुक्ति व्दारा वोळंगती।।

एकदा स्वत: विठ्ठल नामदेव व ज्ञानदेवांना घेऊन लहुळला कूर्मदासाकडे निघाले. चालता चालता सावतोबाच्या मळयावर असलेल्या पिंपळवृक्षाखाली विश्रांतीसाठी बसले. विठ्ठल म्हणाले, 'तुम्ही थांबा, मी पाणी पिऊन येतो. ' आणि ते थेट मळयात सावतोबाजवळ आले. त्याला म्हणाले, 'सावतोबा, मला लवकर लपव.' सावतोबा म्हणाले, 'तुम्हाला लपवू कुठे? तुम्ही तर सर्वत्रच आहात. रिकामी जागाच नाही.' देव म्हणाले, ''हे खरं. पण ते नामदेवाला समजावे म्हणून हे नाटक आहे.'' सोवतोबांनी खुरपाने आपले पोट चिरले. देवाला आपल्या हृदयात बसवले. वर धोतर गुंडाळले. देव अजून आले नाहीत म्हणून ज्ञानदेव व नामदेव सावताकडे गेले. देव त्याच्याकडे असावेत असे त्यांना वाटले. देवाची भेट करून द्या अशी त्यांनी विनंती केली. सावतोबांनी देवाला बाहेर काढताच सर्वानाच प्रेमाचे भरते आले. ही कथा लिहून झाल्यावर पांगारकर म्हणतात, ''भगवद्‌भक्त जो धंदा, व्यवसाय किंवा कर्म करतात तो त्यांच्या अहर्निश उपासानेच्या बळाने पवित्र होऊन जातो. जो आपल्या वाटयाला आलेले काम चोख करतो त्याच्यामुळे धंधाला उच्चता येते.'' या प्रसंगाचे वर्णन करताना संत नामदेव म्हणतात,

सावता माळी भक्त प्रेमळ । त्याज पाशी जाय घननीळ।।
लपावया मागता स्थळ । उदर तत्काळ चिरियले।।

## ईश्वरभक्ती

सावतोबाच्या उदरातून बाहेर आल्यावर विठ्ठल म्हणाले, ''ज्ञानदेव नामदेव माझ्या भक्तांनो, पाहिला हा सावतोबाच्या भक्तीचा महिमा. सावतोबा, पाहिजे ते माग.'' सावतोबा म्हणाले, ''मला फक्त आपले चरण कमल पाहिजेत.'' मग पांडुरंग नामदेवांना म्हणाले,''श्रेष्ठ ज्ञानी भक्त हे तुला कळावे, तुला ज्ञानी होण्याची तीव्र आस लागावी हाच या प्रसंगात माझा हेतू होता.''

धन्य ते अरण, रत्नाचीच खाण । जन्मला निधान सावता तो ।।
सावता सागर ,प्रेमाचा आगर । माळया घरी ।।

— संत नामदेव

संतएका जनार्दनी सावता तो धन्य । तयाचे महिमान न कळे काही ।।

— तुकाराम

यानंतर सावतोबांना आपले जीवितकार्य संपले आहे याची जाणीव झाली. त्यांनी १२ जुलै १२९५ हा दिवस आपला निर्वाण — दिन म्हणून जाहीर केला. या दिवशी त्यांच्या घरी अलोट गर्दी जमली. सावतोबांनी सर्व संताच्या चरणी मस्तक ठेवले. श्रीपांडुरंगाच्या नामाचा गजर सुरू झाला. विठ्ठल विठ्ठल म्हणतच त्यांची प्राणज्योत मालवली.

दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरला मोठी यात्रा भरते. या निमित्ताने निरनिराळया संतांच्या पालख्या पंढरपूरला जातात. महाराष्ट्राच्या काना—कोप—यातून वारक—यांच्या दिंडया पंढरपूरच्या दिशेने रवाना होतात. सावतोबांचा महिमा एवढा थोर की अरणगावी प्रत्येक दिंडी थांबते. रात्री कीर्तन होते.

मागणे ते आम्हा नाही हो कोणासी। आठवावे संतांसी हेचि खरे।



Scanned with OKEN Scanner

पुर्ण भक्त आम्हा ते भक्ती दाविती।। घडावी संगती तयाशीच।।
सावता म्हणे कृपा करी नारायणा।। देव तोचि जाणा असे मग।।

सावतोबांच्या आयुष्यात ब्राम्हणांनी त्यांचा छळ केला हे त्यांची गुरे पळवुन नेणे, मळयाला आग लावणे अशा घटनांतून सिध्द होते. त्यामागे त्यांचे विरोधक ओंकारस्वामी यांचा हात होता. म्हणून सावतोबा म्हणतात–

भली केली हीन याती । नाही वाढली महंती।।
जरी असता ब्राम्हण जन्म । तरी हे अंगी लागते कर्म।।
स्नान नाही संध्या नाही । याति कुळ संबंध नाही।।
सावता म्हणे हीन याती । कृपा करावी श्रीपती।।

परमेश्वर एकरूप झालेल्या सावतोबाबद्दल ल.रा. नसिराबादकर लिहीतात– ''हरिस्मरणात स्वत:ला पूर्णपणे हरवून बसणारा हा संत. त्याने आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहिला आणि सारे जीवन विठ्ठलमय करून टाकले.''[५]

## निष्कर्ष

सावतोबांच्या चरित्रकथेतून अद्‌भुताला आणि चमत्काराला बाजूला ठेऊन आपण काय घेऊ शकतो? त्यांच्या आयुष्यातील चमत्कारापेक्षा त्यांच्या अभंगातून प्रकट होणारी सामाजिक जाणीव व भक्तीची तीव्रता यांचेच मोल अधिक आहे प्रामाणिक कर्तव्यनिष्ठा व परमेश्वरावरील अढळ श्रध्दा यातूनच मानवाला सुखदु:खापलीकडील श्रेष्ठ आनंदाची लय सापडते. कर्म हाच ईश्वर व मानवता हा धर्म असा संदेश त्यांनी दिला .

सहिष्णूता, निर्भयता, सदाचार, नितीमत्ता अशी गुणवैशिष्टे सावता माळी यांच्या अभंगातून दिसून येतात. त्यांच्या अभंगात शांत, करूण व भक्तीरस भरलेला आहे. शेतमळ्यत भगवंत शोधणारे, वनस्पतीची उत्तम जानकारी असणारे, कर्माला प्राधान्य देणारे, सावतामाळी हे महान संत होते.

## संदर्भ टिपा

१. सौ. मंदा देविदासपंत हिवसे – महान कर्मयोगी (लेख), नागपूर पत्रिका–विशेष पुरवणी – ६.८.१९९४, (पृ. ५)
२. डॉ. स्नेहल तावरे (संपा.) – भारतीय संतांचे योगदान (लेख– वैचारिक प्रबोधन करणारे संत सावता माळी – डॉ. वामन जाधव, स्नेवर्धन प्रकाशन, पुणे २०१५ (पृ. २२६ )
३. श्री. ह. भ. प. ओंकारमहाराज माळी – श्री संत शिरोमणी सांवता माळी, श्री माळी वैभव विश्वकर्मानगर, नागपूर, २०१ (पृ. ६४५)
४. ल. रा. नसिराबादकर – प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके बुकसेलर्स कोल्हापूर, दुसरी आवृती २ री (पृ.७८ )
५. ल. रा. नसिराबादकर – प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके बुकसेलर्स कोल्हापूर, दुसरी आवृती २ री (पृ.७८ )

## संदर्भ ग्रंथ

१. संत सावता माळी – श्री. अशोक शिंदें सरकार –सहयाद्री प्रकाशन, इस्लामपूर,
२. संत सावता माळी यांच्या गोष्टी – सौ. संध्या मुधोळकर – अनमोल प्रकाशन, पुणे
३. www.BookGanga.com.
४. Web.bookstruk.in

❖❖❖



Scanned with OKEN Scanner

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre,** Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**


Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401





☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983


| | | |
|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** ₹ 500/- |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** |
| **MICR coe** | - | **445014001** |
| **A/c No.** | - | **60175373000** |
| **Mode of Payment** | - | **By NEFT transfer or crossed cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit or Google pay in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** |


**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



ISSN 2454-7409

9 772454 740993



Scanned with OKEN Scanner